जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत मंजूर अनुदानातून ३ टेस्ला यंत्रसामुग्री खरेदीसाठी आवश्यक असलेली अतिरीक्त रक्कम अदा करण्यास मान्यताबाबत

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : जीएचए-२०१८/प्र.क्र.२४९ /प्रशा-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

वाचा :

१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक ०७.०३.२०१८

४) शासन निर्णय समक्रमांक १४.०८.२०१८

५) जिल्हाधिकारी, तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती, औरंगाबाद यांचे पत्र क्र.जिवायो/प्रस्ताव/२०१९-२०/१०६४,दि.२७.०५.२०१९.

६) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं / यंसाख / शावैमरुऔ / ३ टेस्ल एमआरआय / जिवायो / सुप्रमा / १२१८५/, दिनांक २६.०८.२०१९

<u>शासन निर्णय</u> :-

उपरोक्त शासन निर्णय, समक्रमांक दिनांक १४.०८.२०१८ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेस श्री. साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून प्राप्त अनुदानातून ३ टेस्ला एमआरआय ही यंत्रसामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने हाफकीन

महामंडळाने राबविलेल्या निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने सदर यंत्रसामुग्रीसाठी हाफकीन महामंडळास रुपये १५,९०,०००,०० (रुपये पंधरा कोटी, नव्वद लक्ष फक्त) इतका देकार प्राप्त झालेला आहे. सबब , सदर यंत्रसामुग्री खरेदीसाठी आवश्यक असणारी अतिरीक्त रुपये ९०,००,००० (रुपये नव्वद लक्ष फक्त) इतकी रक्कम शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेस जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपरोक्त दिनांक २७.०५.२०१९ च्या पत्रान्वये मंजूर निधीतून भागविणेबाबत संचालनालयाने प्रस्तावित केले आहे.

संचालनालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन निर्णय, समक्रमांक दिनांक १४.०८.२०१८ मधील अटींच्या अधीन राहून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेसाठी ३ टेस्ला एमआरआय ही यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी आवश्यक असणारी रुपये ९० लक्ष इतकी रक्कम संबधित संस्थेस जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपलब्ध झालेल्या निधीतून उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. या प्रयोजनासाठी आवश्यक असणारी उपरोक्त अतिरीक्त रक्कम खालील लेखाशीर्षातून उपलब्ध करून देण्यात यावी.

मागणी क्रमांक ३१

४२१०	-	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च
०३	-	वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन
१०५	-	विषमचिकित्सा
(४७)	-	जिल्हा योजना - औरंगाबाद
(४७) (०१)	-	रुग्णालयासाठी यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी (४२१० १४३१)
(५२)	-	यंत्रसामुग्री व साधनसामुग्री

३ शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१३१९१४१२२०१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHAR RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a5089 7b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec097 8235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.09.13 19:37:19 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार - २ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉपोरेशन लि., मुंबई.
३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
५. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद
६. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद .
७. निवडनस्ती (प्रशा-१).